# पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर.

प्लॉट नं.१, सेक्टर-१५, कोळगाव, पालघर-नवनगर,
जिल्हा-पालघर,दुरध्वनी-०२५२५ २५११००(कार्यालय)
E-mail : sp.palghar@mahapolice.gov.in


**पोलीस शिपाई भरती २०२२-२०२३**

**लेखी परीक्षेकरिता पात्र ठरलेल्या उमेदवारांची अंतिम गुणवत्ता यादी प्रसिध्द करणेबाबत...**

दिनांक :- ०८/०७/२०२४

-----oo-----

पालघर जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवर 59 रिक्त असलेल्या पदांकरिता (07 पोलीस बॅण्डस्मन पदांसह) पोलीस शिपाई व पोलीस शिपाई बॅण्डस्मन पोलीस भरती 2022-2023 आयोजीत करण्यात आलेली आहे. सदर पोलीस भरती प्रक्रियेत उमेदवारांची शारिरीक व मैदानी चाचणी दि.19.06.2024 ते दि.28.06.2024 या कालावधीमध्ये घेण्यात आलेली आहे. त्यामध्ये गैरहजर/अनुपस्थित वगळून कागदपत्र व उंची / छाती मध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांना पुढील मैदानी चाचणी करीता प्रवेश देण्यात आलेला होता.

सदर मैदानी चाचणीमध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांना मिळालेल्या गुणांच्या आधारे महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम -2011 व त्यानंतर शासनाने वेळोवेळी केलेल्या सुधारणा यामधील नियम 4 (2) नुसार शारिरीक चाचणीत किमान 50% गुण प्राप्त करणारे उमेदवार यांची जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या प्रवर्गांमधील रिक्त पदांच्या 1:10 या प्रमाणात लेखी परीक्षेकरिता तात्पुरती निवडसूची उमेदवारांच्या माहिती करीता policerecruitment2024.mahait.org आणि www.mahapolice.gov.in तसेच www.palgharpolice.gov.in या संकेतस्थळावर दि.02.07.2024 रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. प्रसिध्द करण्यात आलेल्या तात्पुरत्या निवडसूचीमध्ये काही हरकती/आक्षेप असल्यास त्याबाबत दि.04.07.2024 रोजी 16.00वा.पर्यंत या कार्यालयाचे ई-मेल आयडी sp.palghar@mahapolice.gov.in वर मागविण्यात आले होते.

त्याअनुषंगाने उमेदवारांच्या प्राप्त झालेल्या हरकती/आक्षेपांचा सांगोपांग विचार करुन व त्याप्रमाणे प्रसिध्द करण्यात आलेली तात्पुरती निवडसूची बारकाईने पडताळून लेखी परीक्षेकरिता पात्र ठरलेल्या उमेदवारांची **अंतिम गुणवत्ता यादी** उमेदवारांच्या माहितीकरिता policerecruitment2024.mahait.org आणि www.mahapolice.gov.in तसेच www.palgharpolice.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

**(बाळासाहेब पाटील)**
**अध्यक्ष**
**पोलीस भरती निवड मंडळ तथा**
**पोलीस अधीक्षक, पालघर**

Scanned with ACE Scanner